!! श्री !!

शिवसेना

**खासदार चंद्रकांत खैरे**

**शिवसेना उपनेते**

जा.क्र. : खा.का.प्र.प ४५६१८०२-२०१६

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# संभाजीनगरात इंधन डेपो सुरु करा

## शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांची पेट्रोलियम मंत्र्यांकडे आग्रही मागणी

**नवी दिल्ली ता.१८ :** मराठवाड्यात नेहमीच इंधनाचा तुटवडा भासतो, मनमाड इंधन डेपोतील वेगवेगळया कारणांमुळे ही अनेक वेळा इंधन पुरवठ्याला खंड पडत असल्याने मराठवाड्यासाठी संभाजीनगरात स्वतंत्र्य इंधन डेपो सुरु करण्याची आग्रही मागणी शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी आज देहरादुन येथे पार पडलेल्या पेट्रोलीयम व नैसर्गिक वायु सल्लागार समितीच्या बैठकीत केली.

केंद्रिय पेट्रोलियम मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या अध्यक्षतेखाली देहरादुन येथे लोकसभेच्या पेट्रोलियम व नैसर्गिक वायु सल्लागार समितीची बैठक पार पडली या बैठकित खासदार चंद्रकांत खैरे यांनी मराठवाड्याच्या इंधन डेपो शिवाय महत्वाच्या सुचना बैठकित मांडल्या.

मनमाड येथे असलेला इंधन डेपो मराठवाड्याची इंधन मागणी सातत्य ठेवून पूर्ण करु शकत नाही. त्यामुळे अनेक वेळा इंधन तुटवड्याला मराठवाड्यातील वाहन धारकांना सामोरे जावे लागते. हिंदूस्थान पेट्रोलीयमने संभाजीनगरच्या एमआयडीसीत १०० एकर जमीन मागीतली परंतु एमआयडीसीने जमीन उपलब्ध करुन देण्यास असमर्थता दर्शविली असल्याचे बैठकिच्या निदर्शनास आणुन दिले. यावेळी खासदार चंद्रकांत खैरे यांनी महाराष्ट्राचे उद्योन सचिव यांच्याशी याविषयी चर्चा केली व संयुक्त इंधन डेपोसाठी शंभर एकर जमीन उपलब्ध करुन देण्याची विनंती केली.

भारत सरकार विदेशात ज्यागतीने खनिज तेलाची खुदाई व उत्पादन (एक्सप्लोरेशन अॅण्ड प्रोडक्शन) करते. त्या गतीने भारतात खनिज तेलाची खुदाई उत्पादन (एक्सप्लोरेशन अॅण्ड प्रोडक्शन) का करत नाही. असा सवाल उपस्थित करत भारतात खनिज तेलाची खुदाई उत्पादन (एक्सप्लोरेशन अॅण्ड प्रोडक्शन)ला गती दिल्यास मोठ्याप्रमाणत महसुल मिळेल.

कच्या तेलांच्या कमी झालेल्या किमती यातुन सरकारला होत असलेला लाभ आणि या बचतीतुन खर्च कसा केला जात आहे. यासंबंधीत खासदार चंद्रकांत खैरे यांनी प्रश्न उपस्थित केला. वाढत्या प्रदूषणा संबंधात भारतातील बीएस चार ग्रेटच्या पेट्रोल आणि डिझेलचा पुरवठा कधी पर्यंत सुरु राहणार याची ही विचारणा केली त्यावर केंद्रीय पेट्रोलियम मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी सांगितले की बीएस ४ ग्रेटचा इंधन पुरवठा २०१७ पर्यत तर बीएस ५ ग्रेटचा पुरवठा २०२० पर्यत सुरु ठेवण्यात येईल. २०१४-२०१५ मधील इंधन निलामी मध्ये सरकारला किती उत्पन्न प्राप्त झालेला लिलाव हा एनईपीएलचा अंतर्गत झाला आहे का व २०१५-२०१६ साठी किती एनईपीएलच्या योजना आहेत. याची ही विचारणा खासदार चंद्रकांत खैरे यांनी केली. या बैठकित पेट्रोलियम सचिव के डी त्रिपाठी, ओएनजीसीचे सिएमडी डि के श्रॉफ, एचपीसीएलचे कार्यकारी निदेशक मुकेश सुराणा, उपसचिव पी एस लोखंडे, उपमहाप्रबंधक ए के जैन यांच्यासह वरिष्ठ अधिकारी बैठकिस उपस्थित होते.

**प्रसिध्दी प्रमुख**

**योगेश पायघन / गणेश वाघ**

कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com ,
8484066606/9604384400/

yp4329@gmail.com
7769052525